राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

तक्रार क्रमांक-१३८/२०२६/नाशिक व्दितीय अपील क्र.- ६४४८/२०२३/नाशिक		
अ.क्र.	तपशील	
१.	श्री. अंकुश काळू देवरे, रा. मु. पो. पोखरी (पा.), ता. नांदगाव, जि. नाशिक- ४२३१०६	तक्रारदार
	विरूद्ध	
१.	जनमाहिती अधिकारी, ज्ञानविकास मंडळ, साकोरा संचलित, माऊली माध्यमिक विद्यालय,पोखरी, ता.नांदगांव, जि.नाशिक - ४२३१०६	उत्तरवादी क्र.१
२.	मुख्याध्यापक, ज्ञानविकास मंडळ, साकोरा संचलित, माऊली माध्यमिक विद्यालय,पोखरी, ता.नांदगांव, जि.नाशिक - ४२३१०६	उत्तरवादी क्र.२

(निर्णय दिनांक ०३/०८/२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक १६/०२/२०२६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) नुसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.आयोगाने व्दितीय अपील क्रमांक ६४४८/२०२३/नाशिक संदर्भात दिनांक २४/०७/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक २०/११/२०२५ अन्वये आदेश पारीत केलेला आहे. तथापि, सदर आदेशानुसार जनमाहिती अधिकारी, ज्ञानविकास मंडळ, साकोरा संचलित, माऊली माध्यमिक विद्यालय, पोखरी, ता.नांदगांव, जि.नाशिक यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत परिपूर्ण माहिती पुरविली नसल्याची तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध अभिलेखावरुन आयोगाच्या असे निदर्शनास येते की, आयोगाने व्दितीय अपील क्रमांक **६४४८/२०२३/नाशिक** संदर्भात दिनांक २४/०७/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक २०/११/२०२५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती पुरविली नसल्याचे दिसून येते.

प्रस्तूत प्रकरणी विद्यमान **जनमाहिती अधिकारी, ज्ञानविकास मंडळ, साकोरा संचलित, माऊली माध्यमिक विद्यालय, पोखरी, ता.नांदगांव, जि.नाशिक** यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने व्दितीय अपील क्रमांक ६४४८/२०२३/नाशिक संदर्भात दिनांक २०/११/२०२५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि. नाशिक यांना आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त निर्देशासह तक्रार क्र. **१३८/२०२६/नाशिक** अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

तक्रार क्रमांक-१३८/२०२६/नाशिक /जावक क्र.४४७५ दिनांक-१२/०८/२०२६

प्रत- माहिती तथा आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि. नाशिक

२.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि. नाशिक

३. निवडनस्ती.